**Maharashtra State Board of**
**Secondary & Higher Secondary Education, Pune**
S.R.No.832-A, Final Pl No. 178,179, Near Balchitrawani,
Behind Agharkar Research Institute, Bhamburda,
Shivajinagar,
Pune-411004.

**महाराष्ट्र राज्य**
**माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे**
स.न.८३२-ए, फा.प्लॉ.नं.१७८,१७९,बालचित्रवाणी
शेजारी, आघारकर रिसर्च इन्स्टिटयूटच्या मागे,
भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे ४११००४

Email : secretary@msbshse.ac.in Telegram : MAHABOSEC, PUNE.
Tel : Chairman (P) : STD . (020)-25651751 । EPABX -25705000 Fax : 25665807 । Secretary(P) : 25651750

क्र.रा.मं./परीक्षा-३/ ६५८४
पुणे - ४११ ००४.
दिनांक - १५/११/२०२१
१७

प्रति,

विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
सर्व विभागीय मंडळे.

**विषय- सन २०२२ मध्ये घेण्यात येणाऱ्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षेची आवेदनपत्रे ऑनलाईन सादर करावयाच्या तारखांबाबत....**

उपरोक्त विषयाबाबत कळविण्यात येते की, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत घेण्यात येणारी परीक्षा सन २०२२ मध्ये घेण्यात येणाऱ्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षेस नियमित, पुनर्परीक्षार्थी, नाव नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेले (Enrollment Certificate) खाजगी विद्यार्थी (Private Candidate), तसेच श्रेणीसुधार योजने अंतर्गत व तुरळक विषय घेवून, ITI (औद्योगिक प्रशिक्षण संस्थेव्दारे Transfer of Credit घेणारे विद्यार्थी)आवेदनपत्रे प्रचलित पध्दतीप्रमाणे ऑनलाईन पध्दतीने भरावयाच्या तारखा प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार आहेत.

सदर परीक्षेस प्रविष्ठ होऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांचे परीक्षेचे आवेदनपत्र ऑनलाईन **www.mahahsscboard.in** या संकेतस्थळावर भरावयाची असून त्यांच्या तारखा व तपशील खालीलप्रमाणे

| शुल्क प्रकार | माध्यमिक शाळांनी नियमित विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे SARAL Database वरून ऑनलाईन पध्दतीने भरावयाच्या तारखा | माध्यमिक शाळांनी पुनर्परिक्षार्थी, नाव नोंदणी प्रमाणपत्र (Enrollment Certificate) प्राप्त झालेले खाजगी विद्यार्थी(Private Candidate), श्रेणी सुधार व तुरळक विषय घेऊन परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांची, ITI (औद्योगिक प्रशिक्षण संस्थेव्दारे **Transfer of Credit** घेणारे विद्यार्थी)आवेदनपत्रे प्रचलित पध्दतीप्रमाणे ऑनलाईन पध्दतीने भरावयाच्या तारखा | माध्यमिक शाळांनी चलन **DOWNLOAD** करुन चलनाद्वारे बँकेत शुल्क भरावयाच्या तारखा |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| अ) नियमित शुल्कासह → | गुरुवार दि.१८/११/२०२१ ते गुरुवार दि.०९/१२/२०२१ | शुक्रवार दि.१०/१२/२०२१ ते सोमवार दि.२०/१२/२०२१ | गुरुवार दि. १८/ ११/२०२१ ते गुरुवार दि. ३०/ १२ /२०२१ |
| ब) विलंब शुल्कासह → | सोमवार दि. २०/१२/२०२१ ते मंगळवार दि. २८/१२/२०२१ (सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत) | | |

अ) आवेदनपत्रे भरावयाच्या कालावधीमध्ये माध्यमिक शाळांनी सर्व विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे भरुन सबमीट केल्यानंतर त्यांना शाळा Login मधून Pre-list उपलब्ध करुन दिलेली असेल शाळांनी त्याची प्रिंट काढून विद्यार्थ्यांमार्फत आवेदनपत्रातील नमूद केलेली जनरल रजिस्टरच्या माहितीनुसार पडताळून अचूक असल्याची खात्री करावी व

त्याबाबत Pre-list वर विद्यार्थ्यांची स्वाक्षरी घ्यावी. त्यानंतर सदर Pre-list चलनासोबत विभागीय मंडळात जमा करावी.

ब) माध्यमिक शाळांनी विभागीय मंडळाकडे शुल्क भरल्याच्या चलनासह विद्यार्थ्यांच्या याद्या व Pre-list जमा करावयाची **तारीख मंगळवार दि.०४/०१/२०२२ अशी राहील.**

इ.१०वी **परीक्षेची आवेदनपत्रे ही ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्यात येणार असल्याने विद्यार्थ्यांनी आवेदनपत्रे त्यांच्या माध्यमिक शाळांमार्फत भरावी. सर्व माध्यमिक शाळातील मुख्याध्यापक यांनी ऑनलाईन आवेदनपत्रे भरण्यासाठी खालील महत्वाच्या बाबी विचारात घेणे आवश्यक आहे.**

१. कोविड–१९ विषाणू प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर शासनाने व विशेषत: आरोग्य विभागाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या सर्व सूचनांचे व नियमांचे काटेकोरपणे पालन करण्याची दक्षता घेण्यात यावी.

२. **शासन** निर्णय **क्र.गव्ह.१५१७/प्र.क्र.१९/संगणक** दि.१४/०८/२०१७ नुसार माध्यमिक शाळांनी नियमीत विद्यार्थ्यांची ऑनलाईन आवेदनपत्रे स्विकारण्यासाठी Saral Database मध्ये विद्यार्थ्यांची अद्ययावत नोंद असणे आवश्यक आहे. सदर Saral Data वरुनच नियमीत विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे भरावयाची आहेत.

३. **पुनर्परिक्षार्थी, नाव नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेले (Enrollment Certificate) खाजगी विद्यार्थी** (Private Candidate), **श्रेणी सुधार, तुरळक विषय घेऊन व ITI** (औद्योगिक प्रशिक्षण संस्थेव्दारे Transfer of Credit घेणारे विद्यार्थी) घेवून **परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांची माहिती Saral Data मध्ये नसल्याने सदर विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे प्रचलित पध्दतीने ऑनलाईनच भरावयाची आहेत. त्याच्या तारखा वरीलप्रमाणे (कॉलम नं.३ नुसार) निश्चित करण्यात आल्या आहेत.**

४. कौशल्य सेतु अभियानाचे Transfer of Credit मागणाऱ्या विद्यार्थ्यांनी देखील online पध्दतीने आवेदनपत्र भरुन विषयासमोर Transfer of Credit ची नोंद करावी. याशिवाय संबंधित विद्यार्थ्यांनी प्रचलीत पध्दतीने आवेदनपत्र व आवश्यक कागदपत्रे यांची हार्डकॉपी (Hard Copy) विभागीय मंडळात जमा करावी.

५. **पुणे,** औरंगाबाद, व कोल्हापूर **विभागीय मंडळातील माध्यमिक शाळांनी** प्रचलीत परीक्षा **शुल्क बँक ऑफ इंडियाच्या** चलनावरील नमूद मंडळाच्या Virtual Account मध्ये जमा करुन **चलनाची प्रत व Pre-list** दिलेल्या मुदतीतच विभागीय मंडळाकडे सादर कराव्यात.

६. मुंबई, नागपूर व लातूर विभागीय मंडळाच्या कक्षेतील माध्यमिक शाळांनी प्रचलीत परीक्षा शुल्क एच.डी.एफ.सी. (HDFC Bank) बँकेच्या चलनावरील नमूद मंडळाच्या Virtual Account मध्ये जमा करुन चलनाची प्रत व Pre-list दिलेल्या मुदतीतच विभागीय मंडळाकडे सादर कराव्यात.

७. अमरावती, नाशिक व **कोकण विभागीय मंडळातील माध्यमिक शाळांनी** प्रचलीत परीक्षा **शुल्क ॲक्सिस** (AXIS Bank) **बँकेच्या** चलनावरील नमूद मंडळाच्या Virtual Account मध्ये **जमा करुन** चलनाची प्रत व Pre-list दिलेल्या मुदतीतच विभागीय मंडळाकडे सादर कराव्यात.

८. **आवेदनपत्रे सादर केलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे शुल्क चलनाद्वारेच भरण्यात यावे.** सर्व माध्यमिक शाळांनी गतवर्षीप्रमाणेच परीक्षा शुल्क संगणकीय चलन Download करुन चलनावरील नमूदप्रमाणे मंडळाच्या Virtual Account मध्ये NEFT/RTGS व्दारे वर्ग करावयाचे आहे. माध्यमिक शाळांनी NEFT/RTGS व्दारे वर्ग केलेली